■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष - ०२ ■ अंक - २७७ ■ बुधवार दि.२५ जून २०२५ ■ आरएनआय - एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 277 ■ Wednesday Dt.25 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# ऐकावं ते नवलंच! आष्टी तालुक्यातील चक्क पाझर तलाव गेला चोरीला

## दैठणा गावातील तलावाची नवी कहाणी कागदावरच झाली त्यांची पाहणी?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ

सायं.दैनिक महाराष्ट्र

# आरंभ

संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

## माय बाप शेतकरी न्यायाच्या प्रतीक्षेत पण् कागदांवर असलेल्या पाझर तलावाच्या काठांवर झांबरे यांचा ठोका

# पाझर तलावाच्या नावाने जिल्हाभरात बोंबाबोंब

## अस्तित्वात नसलेला तलाव आष्टीच्या तालमीत रंगत आणू लागला

## धस -धोंडे -आजबे या लोकप्रतिनिधीच्या नाकावर टिचून संबंधितांची मक्तेदारी वाढली

## तलाव सापडून द्या आणि बक्षीस मिळवा; शेतकऱ्याला संपादनाचे पैसे न मिळाल्यामुळे आक्रोश?

बीड । प्रतिनिधी

गेल्या काही महिन्यांपासून बीड जिल्हा गुन्हेगारी घटनांमुळे सतत चर्चेत आहे. आताही बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील दैठणा गावात चक्क पाझर तलाव चोरीला गेल्याची घटना घडली आहे. जी जमीन शासनाने तलावासाठी संपादित केली होती, त्या जागेवर तलाव नाही. त्यामुळे शेतकऱ्यांना संपादनाचे पैसे मिळालेले नाही. त्यामुळे बबन झांबरे यांच्यासह ग्रामस्थांनी तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु केले आहे. याबाबत सविस्तर माहिती जाणून घेऊयात.



समोर आलेल्या माहितीनुसार, आष्टी तालुक्यातील दैठणा परिसरातील गात ४ मधील पाझर तलाव कागदपत्रावर आहे मात्र प्रत्यक्षात तलावच अस्तित्वात नाही. गेली २० वर्षांपासून बबन झांबरे हे तलावाचा पाठपुरावा करत आहेत, तलाव शोधण्याचा प्रयत्न करत आहेत मात्र आद्याप त्यांना तलाव सापडलेला नाही. त्यामुळे तलाव ज्यांनी चोरी केला आहे त्या आधिकाऱ्यांवर आणि संबंधित व्यक्तींवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत अशी मागणी करत बबन झांबरे व ग्रामस्थांनी आष्टी तहसील कार्यालयसमोर आमरण उपोषणाला सुरूवात केली आहे.

याबाबत बोलताना बबन झांबरे यांनी म्हटले की, माझी जी जमीन तलावासाठी संपादित करण्यात आली आहे तिथे तलाव नाही. मात्र जिथे तलाव बांधलेला आहे तिथली जमीन संपादित झालेली नाही. त्यामुळे आम्हाला त्रासाचा सामना करावा लागत आहे. गावातील गुंड प्रवृत्तीच्या व्यक्ती प्रशासन हाताशी धरुण आमच्यावरच खोटे गुन्हे दाखल करतात. जो पर्यंत चौकशी होऊन संबधीतांवर कारवाई होत नाही तोपर्यंत आमरण उपोषण माघे घेणार नाही. न्याय नाही मिळाला तर आत्महदन करु.

याबाबत बोलताना सरपंच संभाजी झांबरे यांनी म्हटले की, 'मौजे दैठणा गात अ ४ हा तलाव २००७ पासून तलाव चोरीला गेला आहे. हा तलाव कागदावर दाखवला जात आहे. मात्र तलावासाठी संपादित झालेल्या जागेवर गेल्यास तिथे तलाव नाही. त्यामुळे चोरीला गेलेला तलाव आम्हाला सापडून द्यावा. तसेच ज्या लोकांना तलाव चोरी केला आहे, त्यांच्यावर तात्काळ गुन्हे दाखल करुन कारवाई करण्यात यावी.




---

## बीड-परळी महामार्गावर दुचाकीस्वाराचा भीषण अपघात

### प्रा.अमोल लव्हाळे यांचा दुर्दैवी अंत; हेल्मेटमुळे घात झाल्याची चर्चा!

सिरसाळा । प्रतिनिधी

सिरसाळा परिसरातील व सुकळी गावावर अणि महाविद्यालयीन वर्तुळात शोककळा पसरली असून बीड -परळी महामार्गावर हृदयद्रावक घटना घडली आहे. बीड परळी महामार्गावर सिरसाळा गावाजवळ आज सकाळी ९.३० वाजण्याच्या तुम्हाला असे का भीषण अपघातात दुचाकीस्वार प्रा.अमोल बालासाहेब लव्हाळे (रा.सुकळी) यांचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे.



विशेष बाब म्हणजे डोक्याला लागलेल्या हेल्मेट मुळेच त्यांना गंभीर दुखापत झाली आणि त्यामुळे त्यांचा जीव घेण्याची प्राथमिक चर्चा घटनास्थळी सुरू असल्याने अनेकांना धक्का बसला आहे. या घटनेमुळे सुकळी गावावर आणि श्री पंडित गुरु पार्डीकर महाविद्यालयीन वर्तुळात शोकाकुळ पसरली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार परळी सिरसाळा रस्त्याची काम नुकतेच पूर्ण झाले आहे. मात्र बीड कडून शिरसाळ्याकडे जाताना जैन पेट्रोल पंपाजवळ रस्त्याचे काम अर्धवट राहिल्याने त्या ठिकाणी वारंवार अपघात होत असल्याचे समोर आले आहे. आज सकाळी याच धोकादायक ठिकाणी बीड कडून सिरसाळ्याकडे जाणाऱ्या भारत ब्रँच कंपनीच्या एका हैवाने अचानक ब्रेक दाबले. त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या एम. एच. ४४ आर ९०८१ या दुचाकीची हायवाला जोरदार धडक बसली आणि हा भीषण अपघात घडला, अशी प्राथमिक माहिती समोर येत आहे.

अपघातानंतर अमोल लव्हाळे हे जागीच कोसळले आणि गंभीरित्या जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांनी पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांना उपचारासाठी प्रथम सिरसाळा येथील खाजगी रुग्णालयात घेण्यात आले. मात्र त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याने पुढील उपचारासाठी परळी येथील फड यांच्या रुग्णालयात पाठविण्यात आले. तेथे तपासणी ती त्यांना मृत घोषित केले. अपघाताचे नेमके कारणअद्याप स्पष्ट झालेले नसले तरी. घटनास्थळी उपस्थित नागरिकांमध्ये आणि प्रत्यक्ष दर्शनी मध्ये एकच चर्चा सुरू आहे की डोक्याला लावलेल्या हेल्मेट मध्येच अडकल्याने त्यांना गंभीर दुखापत झाली. आणि त्यांचा जीव वाचू शकला नाही. ही चर्चा ऐकून अनेकांना धक्का बसला आहे. कारण हेल्मेट हे सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचे मानले

पान २ वर

---

## मरळवाडी शिवारात वाहनासह चार लाखाची दारू जप्त

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी वैजनाथ ते मरळवाडी रस्त्यावर पोलिसांनी दारूची वाहतूक करणारे वाहन आणि त्यातील दारू असे चार लाख रूपयांचा ऐवज जप्त केला. याप्रकरणी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, आज दि. २४ जुन २०२५ रोजी अवैध धंद्यावर कारवाई करण्याबाबत आदेश मिळाल्यावरून पोलीस उपनिरीक्षक सुशांत सुतळे यांच्या पथकाने परळी ते मरळवाडी जाणाऱ्या रोडवर पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, मरळवाडी ता. परळी शिवारात इसम नामे संतोष मस्के हा स्विफ्ट डिझायर कारने अवैधरित्या दारू वाहतूक करणार आहे. यावरून दोन पंचासह धाड टाकली असता संतोष दगडूबा मस्के, सय्यद रहेमान सय्यद नौमन, बाळासाहेब योगीराज यादव सर्व रा. परळी यांचेसह स्विफ्ट गाडी मिळून आली. त्यांचे ताब्यातून २१५८० रुपयाची देशी-विदेशी दारू, एक फोर व्हीलर ४००००० /- रुपये एकूण ४२१५००/रुपयांच्या मुद्देमाल जप्त करण्यात आला. त्यांचे विरुद्ध पो स्टे परळी ग्रामीण येथे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या पुढाकाराने ३२४ प्रकल्पग्रस्त कुटुंबांना नोकऱ्या नाकारल्याचा प्रश्न मार्गी

### अन्यथा राज्य शासन रिलायन्स इंडस्ट्रीजवर कारवाई करणार

बीड । प्रतिनिधी

रिलायन्स इंडस्ट्रीजच्या रायगड जिल्ह्यातील नागोठाणे येथील प्रकल्पासाठी जमीन देणाऱ्या एकूण ३२४ प्रकल्पग्रस्त व्यक्तींना नोकऱ्या नाकारल्याचा प्रश्न वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांच्या पाठपुराव्यामुळे मार्गी लागला आहे. वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांच्या ठाम नेतृत्वामुळे आणि सततच्या पाठपुराव्यामुळे आज राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत नागोठाणे येथील आय.पी.सी.एल. (सध्या रिलायन्स इंडस्ट्रीज) प्रकल्पासाठी जमीन



देणाऱ्या प्रकल्पग्रस्त कुटुंबांच्या मागण्या मांडण्यात आल्या.

ॲड. प्रकाश आंबेडकर, ॲड. संदेश मोरे आणि ॲड. हितेंद्र गांधी यांनी सरकारच्या निदर्शनास आणून दिलं की, प्रशासनाने एकूण १,२३७ प्राधान्य प्रमाणपत्रे जारी केली होती, परंतु त्यापैकी केवळ ६९० व्यक्तींनाच नोकऱ्या

पान २ वर

---

## धारूरच्या मुख्य बाजारपेठेतील नव्या रस्त्याच्या बोगस कामाकडे जिल्हाधिकारी साहेब लक्ष देणार का ?

### बांधकाम विभागाचे अधिकारी झाले फितूर तर रोडचे काम रात्रीतून होतेय थातूरमातूर





धारूर । प्रतिनिधी

शहरातील रस्त्यासह विकास कामाची वाट लागली होती. विकास कामे होत नसल्याने शहर भकास झाले होते. आता कुठे विकास कामे व्हायला सुरुवात झाली. त्यामध्ये कोट्यावधी रुपयाचा निधी येऊन मुख्य बाजारपेठेचा रस्त्याचे काम चालू आहेत पण त्या कामात सुद्धा संबंधित अधिकाऱ्याला गुत्तेदाराने कमिशन देऊन पहिल्याच डांबरी रस्त्यावर खडीचे थर रचून व गुत्तेदार रात्रीच्या अंधारात काम उरकण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसत आहे.

धारूर शहरांमध्ये व्यापारी नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीनंतर छत्रपती शिवाजी महाराज, चौक काशिनाथ चौक, तसेच हनुमान मंदिराकडे जाणारा

पान २ वर

### आर.टी.एल. लेव्हल प्रमाणे दीड फुटाचे खोदकाम बंधनकारक असून खोदकाम नाहीच

धारूर शहरामध्ये होत असलेल्या सिमेंट आर टी एल लेव्हल प्रमाणे चढ उतार नुसार खोदकाम करून पून्हा भरई करून काम करणे असे नियमानुसार दाखवते परंतु धारूर शहरात जो रस्ता होत आहे त्या रस्त्यावर कुठेही खोदकाम झाले नसून किंव्हा होत असताना दिसून येत नाही करोडे रुपयाचे काम असताना आणि शहरातील वाहतुकीसाठी दीर्घ काळ चालणारा रस्ता असा होत असताना सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी मात्र गप्प दिसून येत आहेत हे काम सुरु असताना बांधकाम विभागाचा अधिकारी कामाकडे फिरकत पण नाही धारूर शहरातून मुख्य रस्ता च्या सिमेंट रोड चे काम होत नियमावली नुसार काम करण्यात येत नाही. आर टी लेव्हल प्रमाणे रस्तादीड फूट खोल करून पुन्हा त्यात भराई करणे आवश्यक असताना सबंधितगुत्तेदारकडुन फक्त काम करत असताना फक्त मागील रस्ता जी सी बी द्वारे वरचे वर उकरून पुन्हा त्यावर खडी टाकून दाबाई करण्यात येत आहे या बाबत बांधकाम विभागचे अधिकारी मात्र गप गार का आहेत हेच कळत नाही.

# तहसीलदार श्रीकांत निळे साहेब, निराधार योजनेच्या वैभव जाधवला आवरा

धारूर । प्रतिनिधी
निराधार योजनेमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकार रिव्हेरिफिकेशन करत आहे. कुणाचे मोबाईल नंबर आधारशी जोडलेले नाहीत. कुणाची जन्मतारीख बरोबर नाही. मयत व्यक्तीचे देखील पेमेंट उचलले जाते. काही निराधारांचे डी.बी.टी. लिंक नसल्यामुळे त्यांना पेमेंट मिळत नाही. या सगळ्या प्रक्रियांमध्ये योजनेच्या लाभधारकांना अनेक संकटाना तोंड द्यावे लागत आहे. याचाच फायदा घेणारे एजंटगिर लोक सक्रिय झालेले आहेत. अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणावर लाभदारकांची अर्थिक लूट होताना दिसत आहे.




एकीकडे हा सगळा प्रकार सुरू असताना निराधार योजनेच्या विभागामध्येही मोठा घोळ सुरू आहे. किल्ले धारूर येथील निराधार विभागाचे कर्मचारी वैभव जाधव हे काही महिन्यापूर्वी अँटी करप्शन मध्ये सापडलेले असताना त्यांना पुन्हा निराधार विभागाची नियुक्ती देण्यात येते कशी? बरं नियुक्ती दिल्यानंतरही या व्यक्तीमार्फत कोतवालांना हाताशी घेऊन तसेच अनेक एजंटगिरी करणाऱ्या लोकांना हाताशी धरून निराधांच्या फाईली वेगळ्या केल्या जातात. या एजंटच्या मर्जीप्रमाणे आर्थिक फायद्यासाठी एक ठराविक रक्कम घेऊन फायली मंजूर केल्या जातात. यामुळे खरा लाभार्थी ज्याने वर्षभरापासून आपली फाईल आज ना उद्या मंजूर होईल या विश्वासाने निराधार विभागात जमा केलेली असते, परंतु अशा फाईली कित्येक दिवस धूळखात पडतात आणि आपल्या आर्थिक फायद्यासाठी वैभव जाधव सारखे कर्मचारी गावच्या कोतवालांना आणि एजंटगिरी करणाऱ्या लोकांना सोबत घेऊन खऱ्या लाभधारकांना फाट्यावर मारतात.
किल्ले धारूर चे तहसीलदार मा.श्रीकांत निळे साहेबांनी या प्रकरणामध्ये स्वत: लक्ष घालून अशा लोकांवर योग्य ती कारवाई करावी. अशा लोकांची फळी मोडून काढावी, अशी येथील अनेक संघटनांची, स्थानिकांची, लाभधारकांची व सर्वसामान्य व्यक्तींची मागणी असल्यामुळे तहसीलदार निळे साहेबांनी स्वत: लक्ष घालून निराधार योजनेच्या खऱ्या लाभार्थ्यांना योग्य तो न्याय मिळवून द्यावा.



बीड : येथील प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरिय विश्व विद्यालय येथे मम्मा दीदी यांचा ५० वा स्मृती दिन साजरा करण्यात आला. त्या प्रसंगी विशेष उपस्थिति सोनल ताई पाटील, सविता चरखा, संगीता सिकची आणी सेंटर च्या प्रमुख प्रज्ञा दीदी.

# खरसाडे बंधूंच्या जय हिंद हॉटेलने जिल्हात नावलौकिक करावा : तालुकाप्रमुख सिंघन

बीड । प्रतिनिधी
आज बीड तालुक्यातील आहेर वडगाव येथील आत्माराम खरसाडे उर्फ दादा यांचे चिरंजीव शिवाजी खरसाडे व पंडित खरासाडे या बंधूंनी बीड शहरापासून अवघ्या १ कि.मी. अंतरावर बार्शी रोडवर सर्व सोयी युक्त, प्रशस्त वातावरणात व महिलांसाठी व सह कुटुंब जेवणाची व्यवस्था असलेले शाखाहारी व मांसाहारी असलेले भव्य हॉटेल जयहिंद लोकांच्या सेवेसाठी सुरू केले आहे या हॉटेलचे उदघाटन खरसाडे यांचे आईवडील यांच्या शुभहस्ते व शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन व कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी अध्यक्ष अरुण नाना डाके यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले.
यावेळी मान्यवरांनचा खरसाडे परिवाराच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी शुभेच्छापर भाषणात सिंघन व



डाके यांनी सांगितले की, आत्माराम खरसाडे यांची मुल मेहनती व कष्टाळू आहेत, सुरुवातीला त्यांनी लोकांच्या हॉटेलवर वेटरची कामे केली व अनुभव घेतल्यानंतर आज त्यांनी एवढं मोठं हॉटेल सुरू केले आहे. ग्रामीण भागातील तरुणांनी केलेल हे धाडस निश्चितच कौतुकास्पद आहे. आपल्या समाजातील नवयुवकांनी व्यवसायात उतरून आपलं जीवन यशस्वी करावे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी खरसाडे परिवाराचा सर्वांनांच्या वतीने सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.
या कार्यक्रमाला सामाजिक कार्यकर्ते अशोकराव खरसाडे, माजी उपसरपंच रोहिदास रोहिले सर, पोलिस पाटील सखाराम काटे, पिंटु ढोले, राजूशेठ ढोले, खंदारे सर, चेअरमन शहादेव कापले, मिठू थोरात, नितीन काळे, पारस कापले, आदिनाथ ढोले, रघुनाथ ढोले, संभाजी दुधाळ, अरुण कदम, आजिनाथ कदम, श्रीराम खररसाडे, बांबू शिंदे, शेषराव शिंदे, बापूराव खरासाडे, रमेश रोहिटे, दिनकर इंगोले, म्हातारजी इंगोले, सुदामा देवकर, लक्षमन भोसले, गरजू जाधव, सुनिल कदम, महादेव हुंबे, रंजित शेळके, नितीन शेळके, पांडुरंग खरसाडे, दादाराव खराडे, सुनिल खराडे, लक्षमण शिंदे, बांबू शिंदे यांच्यासह परिसरातील व बीड शहरातील मान्यवर व सर्वसामान्य लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार शिवाजी खरसाडे यांनी मानले.

# पोलीस निरीक्षक पवार यांच्या हस्ते पुजा करून वारकऱ्यांना अल्पोपहार व महाप्रसादाचे वाटप

बीड । प्रतिनिधी
श्रीसंत मुक्ताईंची पालखी मुक्ताईनगर येथून पंढरपूर कडे रवाना होत असताना दोन दिवसांसाठी बीड शहरात मुक्कामी असते, यावेळी बीड शहरातील भाविक मोठ्या उत्साहात पालखीचे स्वागत करत वारकरी बांधवांच्या सेवेतच विठ्ठलाचे दर्शन करत असतात.
बीड शहरातुन पंढरपुरकडे प्रस्थान करते वेळी सामाजिक क्षेत्रातील संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने पालखीचे हर्षोल्लासात मध्यवर्ती बसस्थानक समोर स्वागत करण्यात आले. हा पालखी सोहळा शहरातील माळीवेस चौक, सुभाष रोड, बसस्थानकमार्गे वारकरी दिंड्या, पताका, ध्वजकरी, विठूरायाचे नामस्मरण करीत कपिलधार येथील मंदिरात मुक्कामी जातात. यावेळी वारकर्यांना संकल्प युवा सामाजिक प्रतिष्ठानच्यावतीने बस स्थानक समोर हॉटेल अन्नपूर्णा येथे फराळाचे वाटप करण्याची परंपरा गेल्या १० वर्षी पासुन अवितरपणे चालू आहे.



याहीवर्षी शिवाजीनगर पोलिस निरीक्षक श्री. किशोर पवार साहेब यांच्या हस्ते पुजा करून अल्पोपहार वाटप करण्यात आला आहे.
यावेळी पालखी सोहळयाचे संस्थानप्रमुख ऍड. रविंद्र पाटील, दिंडीचे प्रमुख हरणे पाटील, महंत श्री. अमृताश्रम महाराज, पोलीस निरीक्षक श्री. पवार साहेब, किशनसिंग चौहान यांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार घालून आदरयुक्त सत्कार प्रतिष्ठानच्या सदस्यांच्या हस्ते करण्यात आला.
श्रीसंत मुक्ताईंच्या पालखीची महाआरती प्रतिष्ठानचे प्रमुख संतोष मेहता, प्रशांत डोरले, तिलक झाडीवाले यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पालखी सोहळ्यात सहभागी झालेल्या प्रत्येक वारकर्याला फराळ म्हणून केळी, चिवडा, राजगीरा लाडू, चिप्स असे विविध फराळाचे वाटप करण्यात आले.
यावेळी शहरातील नागरिक व सर्व व्यापारी सह प्रतिष्ठानचे सदस्य कृष्णा जाधव, बाबासाहेब वणवे, रवी देवकर, करण पाबळे, जयराज जाधव, हर्षवर्धन पाटील, प्रवीण मते, आदित्य नवले, वैभव काळे, श्रेय जैन, यशराज जाधव, देवेश जैन सह अन्य सहकारी मोठ्या संख्येने उपस्थिती होते.

पान १ वरून...

## धारूरच्या मुख्य बाजारपेठेतील नव्या रस्त्याच्या बोगस

मुख्य रस्त्याचे काम सध्याला सुरू आहे परंतु संबंधित अधिकारी याना कमीशन देऊन पहिल्याच रस्त्यावर खडीचे थर देऊन गुत्तेदार काम करत आसल्याचे दिसत आहे. नागरिकांमध्ये चर्चा चालू आहे. या बाबी कडे नागरिक दुर लक्ष का करत आहेत, एक तर कित्येक वर्षापासून रस्त्याची मागणी असताना, कसं बसा रस्त्याचे काम होत आहे. या कारणाने नागरिक सुद्धा गप बसलेले दिसत आहेत. याचा फायदा तसेच संबंधित अधिकाऱ्याला गुत्तेदारांनी कमिशन देऊन मुख्य बाजारपेठेतील रस्त्याचे काम थातुरमातुर करत असल्याचे नागरिकांमध्ये बोलले जात आहे. मुख्य बाजारपेठेच्या रस्त्याला खोदकाम मुरूम न करता पहिल्याच डांबरी रस्त्यावर खडेचे थर रचून रस्त्याचे काम करत असल्याचे दिसत आहे. काम दिवसा कमी व रात्रीच्या मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. या सर्व प्रकारे मुळे नागरिकांना पुन्हा खंडामय रस्ता पाहायला मिळणार हे नक्कीच. त्यामुळे नागरिकांनी याकडे लक्ष दिले पाहिजे. तसेच या बोगस कामाकडे जिल्हाधिकारी लक्ष द्यावे अशी मागणी धारूर शहरातील नागरिकाकडून होत आहे.

## अन्यथा राज्य शासन रिलायन्स इंडस्ट्रीजवर कारवाई करणार

मिळाल्या आहेत. उर्वरित ३२४ पात्र प्रमाणपत्रधारकांना आजतागायत नोकरी मिळालेली नाही, जे २६ एप्रिल १९८६ व २५ एप्रिल १९९० रोजी झालेल्या अधिकृत बैठकीतील आश्वासनांचे उल्लंघन आहे. या प्रकरणाचा आढावा घेतल्यानंतर मा. मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी रायगड जिल्हाधिकाऱ्यांना ७ दिवसांत ३२४ पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करून ती रिलायन्स इंडस्ट्रीजकडे सादर करण्याचे निर्देश दिले. तसेच या व्यक्तींना तातडीने नोकऱ्या देण्याचे आदेशही दिले. जर रिलायन्सने यामध्ये सहकार्य केले नाही, तर शासनाकडून कठोर कारवाई केली जाईल, त्यात कंपनीचे प्रकल्प सील करणे किंवा बंद पाडणे यासारख्या उपायांचा समावेश असणार आहे.
या लढ्याला भूमिपुत्र प्रकल्पग्रस्त सामाजिक संस्थेचे अध्यक्ष गंगाराम माया मिंमिने आणि वंचित बहुजन माथाडी, ट्रान्सपोर्ट व जनरल कामगार युनियनचे सचिव सुरेश गणपत मोहिते यांनी सक्रिय पाठिंबा दिला आहे. आजचा निर्णय हा विकासासाठी आपली जमीन देणाऱ्या कुटुंबांना दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्याच्या दिशेने एक ठोस पाऊल आहे. प्रकाश आंबेडकर यांच्या दृढ नेतृत्वामुळे या कुटुंबांच्या मागण्या राज्य शासनाच्या सर्वोच्च पातळीपर्यंत पोहोचल्या आहेत आणि नोकरी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, अशी भावना प्रकल्पग्रस्त नागरिकांनी व्यक्त केल्या आणि ॲड. प्रकाश आंबेडकर, वंचित बहुजन आघाडीचे आभार मानले.

## बीड–परळी महामार्गावर दुचाकीस्वाराचा भीषण अपघात

जाते. मात्र या संदर्भात पोलीस अधिक तपास करत आहेत आणि अज्ञात हवं वाहनाचा शोध सुरू आहे.
प्राध्यापक अमोल लव्हाळे यांच्या निधनाने हळहळ अमोल लवळे श्री पंडित गुरु पार्डीकर महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या आकस्मिक निधनाने त्यांचे कुटुंबीय आणि मित्रपरिवार यांच्यावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सुकळी गावावर या घटनेमुळे शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# अंबाजोगाई नगरपरिषदेत टेंडर प्रक्रियेत घोळ करून अनेक टेंडर व विशिष्ट जागा नेत्यांच्या घशात कशा : लोक जनशक्ती पार्टी (रा)

अंबाजोगाई । प्रतिनिधी
अंबाजोगाई नगरपरिषदे अंतर्गत अनेक टेंडर सोडले जातात त्यातच प्रामुख्याने विद्युत विभाग पाणीपुरवठा विभाग स्वच्छता विभाग असे अनेक टेंडर सोडतात ते टेंडर वर्षानुवर्ष नेत्यांची हुजरेगिरी करणाऱ्या कार्यकर्त्यांनाच मिळतात यामध्ये मी त्यांचे कार्यकर्ते कमी दरात हे टेंडर घेतात यामुळे आंबेजोगाई नगरपरिषदेचा कोट्यावधींचा महसूल बुडत असल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाला कर्मचाऱ्यांच्या पगारी करण्यास सुद्धा अडचण येत आहे त्यातच आंबेजोगाई शहरात जवळपास



५०० नळ कनेक्शन अवैध रित्या घेण्यात आलेली आहेत याचीही सुकुल तपासणी पाणीपुरवठा विभागाने करावी तसेच शहरात अनेक ठिकाणी अंधाराचे साम्राज्य पसरले आहे.
जवळपास २० ते २५ लाखाचे महिन्याचे टेंडर असून सुद्धा शहरात अंधाराची परिस्थिती उद्भवत आहे अंबाजोगाई नगरपालिकेच्या अनेक भूखंडांवर भूमापियांचा कब्जा दिसून येत आहे याचा ही मुख्याधिकारी यांनी तपास काढून याच्यावर कायदेशीर कारवाई करावी या आशयाचे निवेदन आज लोक जनशक्ती पार्टी र च्या वतीने मुख्याधिकारी श्रीमती प्रियंका टोंगे मॅडम यांना देण्यात आले. यावेळी निवेदन देताना राजेश भाऊ वाहुळे अशोक भैया काळे आजार भैय्या शेख व इतर आदी उपस्थित होते.

# राज्यस्तरीय कॅनोइंग आणि कायकिंग ड्रगन बोट बीड जिल्हा निवड चाचणी

बीड । प्रतिनिधी
दि. राज्यस्तरीय अजिंक्यपद कॅनोइंग अँड कयाकिंग स्पर्धा करिता बीड जिल्हा संघाची निवड चाचणी व जिल्हा स्तरीय स्पर्धा दि २४ जून २०२५ रोजी साठवण तलाव वंजारवाडी ता. जि. बीड येथे घेतली जाणार आहे.
तरी सदरील निवड चाचणी व स्पर्धा करिता जास्तीत जास्त खेळाडूंनी भाग घ्यावा असे आहवान जिल्हाअध्यक्ष सचिन कराड, सचिव कृष्णा जायभाये, सदस्य दिनकर थोरात, निवड समिती प्रमुख प्र. गोविंद बारगजे, उद्धव नागरगोजे सर, राष्ट्रीय खेळाडू अमरजीत जाधवर, यांनी केले आहे. आपल्या प्रवेशसा साठी ९६८९१०१११९/७९७२८९५७६४/८५५२९५२९४५ या मो. नंबरवर करावा.
सदरील स्पर्धा करिता आपण सकाळी ९ वाजेपर्यंत आपली नोंद करावी नंतर आलेल्या खेळाडूंची प्रवेशिका घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. असे अहवान पत्रकातून कृष्णा जायभाये यांनी केले आहे.

# भटक्या विमुक्तांना न्याय देण्यासाठी प्रशासन खंबीर पाठीशी राहणार : अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक

बीड । प्रतिनिधी
महसूल विभाग व भटके विमुक्त विकास परिषदेच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियानांतर्गत बीडला भटक्या विमुक्तांसाठी शिबिराचे आयोजन सोमवार दि २३/६ रोजी व्ही.आय.पी. लॉन्स पेठ बीड येथे महाराष्ट्र राज्य भटके –विमुक्त विकास परीषद व शासनाच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत भटक्या – विमुक्त जातीतील लोकांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.
या शिबिराचे उद्घाटक म्हणून अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके, डॉ. सुभाष जोशी, माजी जि प अध्यक्ष मीराताई गांधले, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, प्रशांत सुपेकर, भाजप भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ. लक्ष्मण जाधव, भटके विमुक्त मित्रमंडळ सदस्य – बालाजी पवार, भूषण पवार, राजेंद्र बन, डॉ. पैठणकर, डॉ. श्रीमती चोले, सामाजिक कार्यकर्ता




बाबासाहेब कोकाटे, नेहा माळी, महसूल विभाग अधिकारी, मंडळ अधिकारी, तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य विभाग अधिकारी, नगरपरिषद अधिकारी उपस्थिती होती.
यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भटके – विमुक्त विकास परीषद जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी यांनी विकास परिषदेच्या कार्याचा लेखाजोखा मांडला. राज्यात आजपर्यंत ३५००० लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्याचे भाग्य लाभल्याची माहिती दिली. यावेळी भटके विमुक्त विकास परीषद मराठवाडा प्रांत संयोजक उमेश जोगी, डॉ.सुभाष जोशी, डॉ.पैठणकर यांनी भटके विमुक्त मित्र मंडळ प्रत्येक वस्ती पर्यंत पोहचून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहे असे मत मांडले. भटक्या विमुक्त समाजाच्या अनेक समस्या आहेत. समाजाच्या मुख्य प्रवाहापासून हा घटक लांब आहे. इंग्रजांच्या काळापासून या समाजाचे राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान आहे. या समाजाला पुढे आणणे हे प्रत्येकाने आपले कर्तव्य समजले पाहिजे, अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली.
या शिबिरात जात प्रमाणपत्र, आयुषमान भारत कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र देण्यासाठी ३५० लाभार्थी यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली. बीड जिल्ह्यातील सर्व वस्तीचे सर्वेक्षण करून भटके विमुक्त विकास परिषदेने शासनाच्या या कार्यात मोलाचे सहकार्य केले. त्याबद्दल जिल्हा अभियान प्रमुख बबन गिरी व भगवान पवार यांचा प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला. यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की, भटक्या विमुक्त समाजासाठी अनेक जण आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी कोल्हापूर येथे कार्यरत असताना या समाजासाठी मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे. विविध प्रमाणपत्रांचे वाटप केले आहे. आपण माननीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात सुद्धा भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्याची मोहीम कायमस्वरूपी सुरू ठेवू. या समाजासाठी रहिवासी प्रमाणपत्र काढणे, उत्पन्नाचे प्रमाणपत्र काढणे, जातीचे प्रमाणपत्र काढणे यासाठी आवश्यक त्या सर्व सुविधा तहसील कार्यालयामार्फत उपलब्ध करून दिल्या जातील. याशिवाय इतर कार्यालयात सुद्धा कोणत्याही अडचणी येत असतील तर अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक साहेब आणि आमची सर्व टीम सदैव कार्यरत असेल अशी हमी त्यांनी यावेळी दिली.
बीड जिल्ह्यातील भटक्या समाजाच्या वस्तीवरील शेवटच्या माणसांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची हमी प्रशासनाच्या वतीने अपर जिल्हाधिकारी यांनी दिली व प्रशासन भटक्या विमुक्तांच्या खंबीर पाठीशी राहणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी भटक्या विमुक्त समाजातील मसणजोगी समाज अध्यक्ष हनुमंत मोरे, नाथ जोगी समाज अध्यक्ष रंगनाथ पैठणकर, गोसावी समाज अध्यक्ष राजेंद्र बन आदी जण समाज बांधवासह उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमाला प्रमाणपत्र वितरण हस्तगत करण्यासाठी भटक्या – विमुक्त जाती जमातीतील अनेक गरजवंत उपस्थित होते.


# माझं वाटेगाव अन् जोगनी उत्सव..!!

डोंगरांच्या कुशीत वसलेलं एक छोट गाव माझं वाटेगाव. गाव जरी छोट असल तरी इथल माणसं मात्र लय मोठी. आभाळाला कवेत घेण्याचं सामर्थ्य घेऊन या गावात माणसं जनमतात. सुमारे १३० वर्षापूर्वी गावचा पाटील शंकर पाटील यांनी राणोजी मांगापुढ एक खंत व्यक्त केली. आसपासची सारी गाव यात्रा करत आनंदात आपल्या संसाराचा अन् गावचा गाडा हाकतेती पण एवढ मोठ माझं गाव पण त्या गावात मानाची यात्रा नाय आनंद नाय.
माणसं राब राब राबतेती अन् निजतेती. गावात आनंद नाय. शेजारच्या गावच्या यात्रेचा दाखला देत पाटील राणोजीच्या काळजात बारुद भरत होता. मग काय दुसऱ्याच दिवशी मरणाला मारणारा तो मर्द वीर राणोजी आपल्या गबऱ्या नावाच्या घोड्यावर स्वार होऊन शेजारच्या गावात जाऊन आपल्या मनगटातील अफाट बळान अन् वीज सारख्या तळपणाऱ्या तलवारीन त्या जत्रत दंगल केली. माणसांचं मरण होऊन गावच्या अस्मितेसाठी गावात समता नांदावी गाव आनंदान उत्साहान नांदावा यासाठी जोगणी आणली. अन् हे करत असताना त्यांनी गावासाठी बलिदान दिलं.
पुढे ती जोगनी नेण्यासाठी अनेक कावे झाले पण त्याच रणमर्दाचा ढान्या वाघ फकिरा राणोजी साठे नावाचं मरान गबऱ्यावर बसून या गावाच्या अब्रूची राखणं करत होत. पुढ जाऊन याच फकिरान ब्रिटिशांना या कृष्णा वारणेच्या खोऱ्यातून सळो की पळो करून सोडलं. या जिवंत इतिहासाच पान साहित्यरत्न लोकशाहीर डॉ.अण्णाभाऊ साठे यांनी रेखाटलं. अन् आज जवळ जवळ १३० वर्षांची ही ऐतिहासिक पारंपारिक संस्कृती हा लढा आम्ही वाटेगावकर जोपासतोय याचा आनंद होतोय. एकदा सावळा मांगाला बेळगांवला सजा लागली होती. तेव्हा तो सावळा तिथल्या अधिकाऱ्याला म्हणाला होता. साहेब मी जन्मभर इथ राबून मरतो. पण आषाढी आमुसेला एक दिवस मला माझ्या पांढरीत वाटेगावात जाऊन मरू द्या. अन् असाच उत्साह अन् त्या बलिदानाची जाण आज सगळ्यांच्या डोळ्यात होती. आज दिनांक २४/०६/२०२५ रोजी वाटेगावचा ऐतिहासिक जोगनी उत्सव मोठ्या दिमाखात पार पडला. या वाटेगावच्या क्रांतीभूमीत माझा जन्म झाला. या गोष्टीचा अभिमान अन् माजही वाटतो.

लेखक/कवी–
सुरज साठे, वाटेगाव

# लिंबागणेश येथील पाणंद रस्ते, प्राथमिक आरोग्य केंद्र, प्राथमिक शाळा, महावितरण विविध मागण्यांसाठी आ.क्षीरसागर यांना निवेदन : डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी



बीड तालुक्यातील लिंबागणेश गावातील वस्तीवरील पाणंद रस्त्यांची दुरावस्था असुन पावसाळ्यात गुडघाभर चिखलातून शालेय मुलांच्या शाळा, दवाखाना, बाजारहाट, दुधदुभती तसेच खत, बि बियाणे आणि शेतीमालाला वाहतुक करण्यासाठी अडचण येत असुन ग्रामस्थांनी लोकसहभागातून रस्ते करण्यास सुरुवात केली असुन प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे तसेच प्राथमिक आरोग्य केंद्राची ईमारत जीर्ण झाली असुन पावसाळ्यात छताला गळती लागली असुन रूग्णांची गैरसोय होत आहे त्यामुळे मुख्य ईमारत व अधिकारी आणि कर्मचारी यांची मोडकळीस आलेल्या निवासस्थानांची दुरुस्ती करण्यात यावी.

लिंबागणेश येथील ३३ केव्ही उपकेंद्र याठिकाणी वर्षभरापासून उप अभियंता पद रिक्त असल्याने अडचणी येत असुन तातडीने कायमस्वरूपी पदनियुक्ती करण्यात यावी. तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसाठी संरक्षक भिंत बांधण्यात यावी. आदी मागण्यांचे निवेदन आज दि.२५ बुधवार रोजी आमदार आपल्या गावी, आपल्या दारी कार्यक्रमाच्या निमित्ताने बेलेश्वर मंदिर बेलगाव याठिकाणी आलेल्या बीडचे आ.संदिप क्षीरसागर यांना सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी दिले. निवेदनातील मागण्यांबाबत सकारात्मक दर्शवत आ.संदिप क्षीरसागर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना केल्या.

बीड तालुक्यातील ग्रामस्थांच्या शासकीय कामातील अडचणी सोडविण्यासाठी आणि सामान्य ग्रामस्थांशी संवाद साधण्यासाठी प्रशासकीय विभागातील अधिकाऱ्यांसोबत बीड तालुक्यातील लिंबागणेश गणातील गावांची बेलेश्वर संस्थान बेलगाव येथे आज दि.२५ बुधवार रोजी आ.संदिप क्षीरसागर यांनी आमदार आपल्या गावी, आपल्या दारी या विशेष मोहिमेंतर्गत बैठक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रमात स्थानिक ग्रामस्थांच्या समस्यांचे निराकरण करण्यावर भर देण्यात आला. या कार्यक्रमात आ. संदिप क्षीरसागर यांनी लिंबागणेश गणातील ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि तात्काळ निराकरण करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. आमदार आपल्या गावी, आपल्या दारी हि संकल्पना गावागावांतील लोकांच्या समस्या थेट त्यांच्या दारी जाऊन सोडविण्यासाठी आणि लोकांशी संवाद साधण्यासाठी असुन शासकीय योजनांचा लाभ गरजुंपर्यंत पोहोचवणे आणि प्रशासकीय कामातील अडथळे दूर करणे हा मुख्य उद्देश असल्याचे आ.संदिप क्षीरसागर यांनी सांगितले.या उपक्रमाला लिंबागणेश गणातील सर्वसामान्य लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.अशा प्रकारच्या मोहिमांमुळे शासकीय योजनांचा लाभ थेट लोकांपर्यंत पोहोचत असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या बैठकीस तहसील, पंचायत समिती, महावितरण, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग आदी प्रशासकीय विभागाचे अधिकारी आणि लिंबागणेश गणातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.आ.संदिप क्षीरसागर यांच्यासमवेत माजी आ.सय्यद सलिम, बीड जिल्हाध्यक्ष राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी शरदचंद्रजी पवार गट राजेंद्र मस्के, शेषेराव तांबे, आरूण जगताप आदी उपस्थित होते.



# जिल्हा परिषद माध्यमिक शाळा सुलेमान देवळा प्रवेशोत्सव कार्यक्रम विविध उपक्रमाने संपन्न

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळा या ठिकाणी इयत्ता पहिली व नवीन दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव कार्यक्रम, लेझीम, ढोल व डिजे या साहित्य सह फेरी मारून जनजागृती करून शाळेविषयी माहिती दिली.

कार्यक्रमाला गावातील तरुण मंडळ व सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर मंडळी, पालक वर्ग व गावातील सरपंच व उपसरपंच, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष शिवाजी खोरदे, गट शिक्षणाधिकारी सीमा टकले काळे मॅडम व केंद्र प्रमुख जावेद पठाण शाळेचे मुख्याध्यापक भाऊसाहेब चव्हाण सर, साळुंखे सर, खांडवी सर, गव्हाणे सर, लगड सर, म्हस्के सर, जगताप मॅडम, सायंबर सर, जाधव सर, कुंडलिक काळे सर, अरुण दातार सर यांच्या सर्वांच्या सहकार्याने कार्यक्रम उत्साहात साजरा झाला.

# मराठवाडा साहित्य परिषद केजच्या वतीने पद्मश्री कै.मारूती चितमपल्ली यांना श्रद्धांजली

केज । प्रतिनिधी



वृक्षवल्ली आम्हा सोयरी म्हणत संत–महंतांनी वृक्ष व वनराईचे महत्त्व खूप पूर्वीपासून सांगितलेले आहे. अधुनिक काळात आपल्या नौकरी व्यवसाया बरोबरच आपला छंद व आवड जोपासत वन्य जीव व आरण्यांचा अभ्यास करून लिखाण करणारे पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांना त्यांच्या कार्यामुळे आयुष्यात अनेक पुरस्कार मिळाले. आरण्य ऋषी म्हणून प्रसिद्ध असलेले मारूती चितमपल्ली यांचे दि.१८ जून २०२५ रोजी वृध्दापकाळाने देहावसान झालेले आहे. मराठवाडा साहित्य परिषद, शाखा केज यांच्या वतीने पद्मश्री कै.मारूती चितमपल्ली यांच्या श्रद्धांजली कार्यक्रमाचे शासकीय विश्रामगृह, केज येथे दि.२३ जून २०२५ सोमवार रोजी आयोजन करण्यात आले होते.

अरण्यऋषी, वन्यजीव अभ्यासक, ललित लेखक, निसर्ग व वन्यजीव संवर्धन, साहित्यिक पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांच्या जीवन कार्याचा गौरव करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या प्रसंगी मराठवाडा साहित्य परिषद शाखा केजचे संस्थापक अध्यक्ष प्रा.ईश्वर मुंडे, मराठवाडा साहित्य परिषद शाखा केजचे नवनियुक्त अध्यक्ष प्रा. डॉ.नवनाथ काशिद, संस्थापक कार्याध्यक्ष प्रा.हनुमंत भोसले, श्री आश्रूबा सोनवणे, प्रा.डॉ. सुवर्णकार व प्रा.सुरज यांनी पद्मश्री कै.मारुती चितमपल्ली यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून त्यांना शब्द सुमनांनी श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी पद्मश्री कै. मारूती चितमपल्ली यांच्या जीवन कार्यावर शालेय विद्यार्थ्यांची तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्याचे ठरले आहे. या कार्यक्रमासाठी मराठवाडा साहित्य परिषद शाखा केजचे पदाधिकारी व सदस्य यांनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केले.

# मुप्टा संघटना बीड जिल्हा यांची महत्वपूर्ण बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी



मुप्टा शिक्षक संघटनेचे संस्थापक सचिव प्रा. सुनील मगरे यांच्या अध्यक्षतेखाली बीड जिल्हा मुप्टा संघटनेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीत प्राध्यापक शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या विविध समस्यावर चर्चा करण्यात आली. यामध्ये प्रामुख्याने जुनी पेन्शन योजना, नैसर्गिक टप्पा वाढ अनुदान, संच मान्यतेसाठी पटसंख्येची अट शिथिल करणे बाबत, प्रात्यक्षिक परीक्षेचे मानधन ऑनलाईन पद्धतीने करणे, मेडिकल कॅशलेस या प्रश्नावर प्राधान्याने चर्चा करण्यात आली वआंदोलनाची दिशा ठरवण्यात आली. प्रा. सुनील मगरे यांनी शिक्षक संघटना वाढीसाठी चे विविध उपक्रम, आंदोलन याचे महत्त्व पटवून सांगितले.

बीड जिल्हा सर्व कार्यकारणी व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार शिक्षक मेळावा व शिक्षकांचे अधिवेशन याविषयीचे मार्गदर्शन केले. याप्रसंगी संघटनेचे विभागीय अध्यक्ष प्रा.डॉ. संभाजी वाघमारे, विभागीय कार्याध्यक्ष डॉ. भास्कर टेकाळे, बीड जिल्हाध्यक्ष शरद मगर यांनी यथोचित मनोगत व्यक्त केले. शिक्षकांच्या विविध समस्या शिक्षकांनी मांडले यामध्ये प्रामुख्याने प्रा. सुनील मोरे, प्रा. नितीन भोसले, प्रा. गव्हाणे एल.एल., प्रा. मळेकर प्रशांत, प्रा घोलप नारायण आदींनी समस्या मांडल्या. या प्रसंगी जिल्ह्यातील माजलगाव तालुक्याच्या निवडी व नियुक्तीपत्र प्रा सुनील मगरे सर व डॉक्टर संभाजी वाघमारे यांच्या हस्ते देण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने जिल्हा संघटक प्राथमिक विभागाचे अमित वाघमारे, माजलगाव तालुका अध्यक्षपदी अमोल राऊत, तालुका सचिव खळगे सर आदी पदाधिकाऱ्यांची निवड करून त्यांना नियुक्त पत्र देऊन पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

सावता परिषदेच्या महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्ष प्रा. सीमा ढवळे यांची फेरनिवड झाल्याबद्दल प्रा. सुनील मगरे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संघटनेचे जिल्हा सचिव प्रा शशिकांत जावळे यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रवीण तरकसे यांनी केले. याप्रसंगी प्राथमिक चे जिल्हा सचिव शैलेंद्र चिलवंत, जूनियर चे जिल्हाध्यक्ष प्रा. नारायण घोलप, प्राथमिकचे जिल्हाध्यक्ष प्रमोद साळवे सर यांच्यासह बहुसंख्येने शिक्षक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# हपी मेडिकेअर सेटर ने केला आनंदाचा वाढदिवस साजरा

पुणे । प्रतिनिधी




येथील धनकवडी भागात गेल्या दहा वर्षापासुन प्रत्येकांच्या आरोग्याच्या त्रासाला बाह्यउपचाराने थेरपीच्या माध्यमातून मुक्त करण्यासाठी हपी मेडिकेअर सेंटर कार्यरत आहे. या सेंटरमध्ये नुकताच थेरपी लाभार्थी सौ.नलिनी आत्माराम ढेकळे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा करुन आनंद व्यक्त करण्यात आला. याप्रसंगी प्रामुख्याने या सेंटरचे संचालक विकास पाटील यांनी भ्रमणध्वनीद्वारे सौ.ढेकळे यांचेसी संवाद साधुन वाढदिवसा निमित्ताने हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या. तसेच सेंटर मधील मार्गदर्शक, मार्गदर्शिका, थेरपी लाभधारक यांनीही शुभेच्छा देऊन उत्तम आरोग्यासाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

प्रारंभी हपी मेडिकेअर सेंटरच्या वतीने सौ.नलिनी ढेकळे यांचे पारंपारिक पध्दतीने औक्षण करुन वाढदिवस साजरा करण्यात आला. यावेळी थेरपी लाभार्थी आत्माराम ढेकळे यांनी पत्नी सौ नलिनी ढेकळे चा हा आगळा वेगळा वाढदिवस हपी मेडिकेअर सेंटरने उत्साहाने साजरा केल्याबद्दल समाधान व्यक्त करुन येथे थेरपीमुळे चांगले आरोग्य राहते व जीवनात चांगले शरीरच आपला जीवनसाथी असतो. त्यामुळे सर्वांचे चांगले आरोग्य राहण्यासाठी हपी मेडिकेअर सेंटरमधील गोल्ड मट व ॲडव्हान्स बेड ची डेमो थेरपी येथील मार्गदर्शनानुसार घेतल्यास शेवट पर्यंत आपले जीवन तणावमुक्त जगता येईल, असे त्यांनी आपले विचार व्यक्त केले. थेरेपीच्या वेळेचा सदुपयोग करीत धनकवडी सेंटरच्या मार्गदर्शिका माया मडम, सुरेखा मडम, प्रिया मडम, तेजु मडम, स्वाती मडम, प्रिती मॅडम, मार्गदर्शक यशराज माने यांनी उत्कृष्ट आयोजन करुन हा कार्यक्रम यशस्वी केला.

# शिवाजी पाटोळे यांचा सेवापूर्ती समारंभ सोहळा संपन्न

बीड । प्रतिनिधी



गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रयोगशाळा सहाय्यक शिवाजी पाटोळे हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा सेवापुर्ती समारंभ सोहळा रविवारी संपन्न झाला.

रविवार दि.२२ रोजी बीड येथे शिवाजी धोंडीराम पाटोळे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य थिटे ए.एस. हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श शिक्षण संस्थेचे अध्यक्ष नानासाहेब काकडे, शिक्षक नेते उत्तमराव पवार, गिरीश देशपांडे, अशोक जाधव, उमाकांत भद्रशेट्टी सुभाष क्षीरसागर, मुख्याध्यापक महादेव जाधव राजेंद्र कुऱ्हे, अभिषेक राऊत, सुरेश पेशकार, भाऊसाहेब देशमाने, प्रकाश राठोड यांची उपस्थिती होती. शिवाजी पाटोळे हे २९ वर्ष १० महिन्याच्या प्रदीर्घ सेवेनंतर ३१ मे रोजी सेवानिवृत्त झाले त्यांनी सन १९९५ ते २००३ या कालावधीत सेवक, प्रयोगशाळा परिचर या पदावर सेवा केली सन २००६ मध्ये पाडळी हायस्कूल पाडळी येथे प्रयोगशाळा सहाय्यक या पदावर पदोन्नती मिळाली सन२०१८ पासून कृषी पंडित भागूजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पाडळसिंगी येथे ३१ मे २०२५ पर्यंत सेवा करून सेवानिवृत्त झाल्याने त्यांचा शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी कैलास पाटोळे, उत्तमराव पवार, गिरीष देशपांडे, अण्णासाहेब थिटे, नानासाहेब काकडे यांनी आपले मनोगत व्यक्त करून पाटोळे यांना उदंड आणि निरोगी आयुष्य लाभो अशा शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी अजिंक्य चांदणे, सुभाष लोणके, विजय सरवदे, सहदेव खांडे, शिवाजी देवमाने, अविनाश वाघ, दत्तात्रय दुधाळ, प्रशांत सुलाखे यांच्यासह मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, महिला– पुरुषांची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा. श्रीराम जाधव यांनी केले तर शेवटी पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# माजी फौजदार भगवानराव वडमारे यांचे निधन

बीड । प्रतिनिधी



माजी फौजदार भगवानराव वडमारे यांचे आज सकाळी अल्पशा आजारामुळे निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८७ वर्षे होते. शाहू फुले आंबेडकर चळवळ येथील प्रखर नेतृत्व तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा उभारणी संदर्भात महत्वपूर्ण संघर्ष भूमिका बजावली होती.

अंत्यविधी उद्या सकाळी ०८:०० वाजता भगवान बाबा या ठिकाणी होईल. त्यांचे बंधू व परिवारातील बरेच नातेवाईक मुंबई तसेच बाहेरगावी असल्याकारणाने उद्या सकाळी आठ वाजता अंत्यविधीचा वेळ ठेवण्यात आलेला आहे. त्यांच्या पश्चात ०५ मुली आणि ०४ मुले आणि नातवंडे आहेत.



आदिशक्ती, आदिमाया, संत मुक्ताबाई यांच्या पालखीचा दिंडी सोहळा दरकोस दरमुकाम करीत बीड शहरात दोन मुक्काम केल्यानंतर पंढरपुरकडे रवाना होत असताना बीड तालुक्यातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने कोल्हारवाडी फाट्यावर शिवसेना तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन यांनी मनोभावे नतमस्तक होऊन जोरदार स्वागत केले.



# मयत इमरान च्या कुटुंबाची बीड शहर बचाव मंच, SDPI पार्टीच्या पदाधिकाऱ्यांची सांत्वन भेट

बीड । प्रतिनिधी

तेलगाव नाका चौकात झालेल्या अपघातामुळे दुर्दैवीपणे मृत्यू पावलेले इमरान यांच्या कुटुंबीयांना बीड शहर बचाव मंच व डऊझख पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन सांत्वन केले.

त्यांच्या सोबत उपस्थित असलेल्या नागरिकांनी तेलगाव चौकातील कामाची व दुरावस्थेची पाहणी केली, जेव्हा कार्यांची गती खूपच धीमी आहे. यावेळी अनेक लोक उपस्थित होते, ज्यामध्ये डी.जी.तांदळे, ड. नितीन वाघमारे, नितीन जायभाये, सय्यद आबिद भाई, कलीम भाई, हाफिज शेख मोईनुद्दीन, बाजीराव ढाकणे, तसेच आप तक चॅनलचे इमरोजभाई यांचा समावेश होता.

## टी.सी. हरवला आहे

आकाश सुरेश डोईफोडे या नावाचा इयत्ता १२ वी पास चा टिसी बीड ते केज प्रवासादरम्यान हरवला आहे. सदर टि सी सापडल्यास संपर्क साधावा.

आकाश डोईफोडे
८८५५८१८०६८

# चकलांबा पोलिसांची जुगार अड्ड्यावर धाड
## सहा आरोपीसह चार मोटारसायकल जप्त

बीड । प्रतिनिधी



पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या सूचना दिल्या असल्याने या सूचनेनुसार सोमवारी रात्री गस्त घालत असताना एका शेतात जुगार खेळणाऱ्या सहा जणांना चकलांबा पोलिसांनी ताब्यात घेतले. यावेळी चार मोटारसायकल व सहा मोबाईल असा ३ लाख ५८ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सपोनि संदीप पाटील हे स्टाफसह सोमवारी रात्री गस्त घालत असताना तरडगाव शिवारातील एका शेतात जुगार अड्डा सुरु असल्याची माहिती पोलीस पथकास मिळाली. गस्त घालत असताना ही बाब समोर आल्यानंतर चकलांबा पोलिसांनी सदर ठिकाणी धाड मारली असता पोलीसांना पाहून जुगारी यांनी पळ काढला. पोलीस पथकाने त्यांचा पाठलाग करून सहा जणांना पकडले. सदर कारवाईत आरोपींकडून चार मोटरसायकल, सहा मोबाईल व रोख रक्कम ४३,३०० असा एकूण ३ लाख ५८ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. चकलांबा पोलिस ठाण्यात याप्रकरणी १) शहादेव यादव ढोणे राहणार कासरवाडी तालुका गेवराई जिल्हा बीड २) रामेश्वर तुळशीराम गाजरे राहणार शेकटा तालुका गेवराई जिल्हा बीड ३) संपत शंकरराव खेडकर रा चकलांबा ता गेवराई जी बीड ४) भागवत शिवराम शिरसाट रा तरडगव्हाण ता शिरूर जिल्हा बीड ५) बदाम हरिभाऊ महानोर रा कसरवाडी ता गेवराई जी बीड ६) पांडुरंग शेषराव बिचकून चकलंबा ता गेवराई जी बीड अशा ६ जणाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत, अप्पर पोलीस अधिक्षक सचिन पांडकर, पोलीस उपाधीक्षक श्री. राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पो उप नि पवनसिंग अंबरसिंग जंघाळे, पोशिं कैलास विठ्ठल खटाणे, पोशिं किरण सुनील मिसाळ, पोशिं प्रशांत, कल्याण घोंगडे यांनी केली.

# परळी नगरपालिकेचा नविन कचरा डेपो परळीकरांसाठी ठरतोय जीवघेणा

## कचरा डेपोला आग, धुरामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात; मुख्याधिकाऱ्यांनी हात झटकले

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी नगरपालिकेने बसवेश्वर कॉलनी शेजारील डोंगरमाथ्यावर असलेल्या कचरा डेपोतील कचरा पेटवुन दिल्याने या यातुन निघणारा विषारी धुर परळी शहरावर पसरत आहे. अगोदरच औष्णिक वीज निर्मिती केंद्र, सिमेंट फॅक्ट्री व राख वाहतुकीमुळे होणार्या प्रदुषणाचा सामना करत असलेल्या परळीकरांसाठी कचऱ्यातुन निघणारा हा धुर जीवघेणा ठरत आहे.

परळी नगरपालिकेने नागरीकांचा विरोध असतानाही नंदागौळ मार्गावरील कचरा डेपो बसवेश्वर कॉलनी शेजारील डोंगरमाथ्यावर वनखात्याच्या जमीनीशेजारी हलवुन त्या ठिकाणी असलेल्या खदानीमध्ये कचरा साठविला. या कचर्यावर प्रक्रिया करुन खतनिर्मीताचा प्रकल्प गत तीन वर्षांपासून बंदच आहे. हा खत प्रकल्प बंद असल्याने या ठिकाणी असलेला कचरा नष्ट करण्यासाठी कचर्याच्या ढिगांना आग लावली जात आहे. याच डोंगरमाथ्यावर पहाटे व सायंकाळी मोकळा हवा घेवुन मॉर्निंग वॉक व व्यायामासाठी येणार्या नागरीकांची संख्या मोठी आहे. सध्या या कचर्याच्या ढिगातुन मोठ्या प्रमाणात धुर निघत असुन हा धुर गणेशपार, हनुमान नगर, राम नगर, पेठ गल्ली, बसवेश्वर कॉलनी, पंचवटी नगर, नेहरु चौक, वडार कॉलनी, भिमनगर या भागात पसरत आहे. या विषारी धुरामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

मॉर्निंग वॉक, व्यायामासाठी मोकळ्या शुध्द हवेत येणार्या नागरीकांना नाक–तोंड बांधून यावे लागत आहे. याच कचरा डेपोला लागुन वनविभागाची शेकडो एकर जमीन असुन या ठिकाणी असलेल्या जंगलामध्ये मोर, हरिण व अन्य प्राणी मोठ्या संख्येने आहेत. या विषारी धुरामुळे प्राण्यांच्या जीवीतास धोका निर्माण झाला आहे. परळी नगरपालिकेकडुन नागरीकांना सुविधा पुरविण्याऐवजी कचरा डेपोतील विषारी धुर सोडण्यात येत असल्याने नागरीकांतुन संताप व्यक्त होत आहे.



### लागलेली आग विझवू

नविन कचरा डेपोला नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी आग लावलेली नसुन ती आग कचऱ्यातील लोखंड व इतर टाकाऊ साहित्य मिळविण्यासाठी भंगार गोळा करणाऱ्यांनी लावलेली असावी. यामुळे हवा प्रदुषित होत असुन ही आग विझवण्याच्या सुचना देणार.

– **त्र्यंबक कांबळे,** मुख्याधिकारी, न.प.परळी

### विषारी धुरामुळे फुफ्फुसांचे आजार

नगरपालिकेच्या कचरा डेपोत शहरातील सर्वच प्रकारचा कचरा असल्याने या कचर्यातुन निघणारा धुर मानवी आरोग्यासाठी घातक असुन या धुरामुळे फुफ्फुसांचे आजार होत असतात.हा धुर तात्काळ बंद होणे आरोग्याच्या दृष्टीने आवश्यक आहे.

– **डॉ.अरुण गुट्टे,** वैद्यकीय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय

# आमदार साहेब, महेदवीया दायरा कब्रस्तानचीही पुन्हा एकदा पाहणी करून संरक्षक भिंतींची अवस्था बघा : एस.एम.युसूफ

बीड । प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार संदीप क्षीरसागर यांनी खासबाग–मोमीनपुरा येथील नागरिकांचे हाल थांबविण्यासाठी बिंदुसरा नदीवर नियोजित पूल व्हावे याकरिता नुकतीच पुन्हा एकदा पाहणी केली. हा पूल निर्माण व्हावा म्हणून सर्वप्रथम आवाज बुलंद करणारे आणि या पुलाच्या निर्माणासाठी लागोपाठ दोन वर्षे डुबकी लगाव आंदोलन करणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी या प्रश्नासोबतच मोमीनपुरा भागातच असलेल्या महेदवीया दायरा कब्रस्तान ची सुद्धा पुन्हा एकदा आमदार साहेबांनी पाहणी करून कब्रस्तानच्या संरक्षक भिंतींची अवस्था बघावी असे आवाहन ही केले आहे.





याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, यापूर्वी महेदवीया समाजाच्या आग्रहानंतर आमदार संदीप क्षीरसागर यांनी २३ जानेवारी २०२३ रोजी स्वत: जातीने येऊन महेदवीया दायरा कब्रस्तान ची पाहणी केली होती. पाहणी करताना कब्रस्तानची अवस्था, तुटलेल्या भिंती, तेथून कब्रस्तानात येणारी कुत्री, कबरींना नुकसान पोहोचवून कब्रस्तानची पवित्रता खराब होत असल्याचे पाहून आश्वासन दिले होते की, लवकरच महेदवीया दायरा कब्रस्तानची संरक्षक भिंत आमदार फंडातून बांधून देतो. पाहणी दरम्यानच्या या आश्वासनाला आता अडीच वर्षांपेक्षा जास्त कालावधी उलटला आहे. मात्र अजूनही कब्रस्तानची संरक्षक भिंत बांधून देण्यात आली नाही. म्हणून आमदारांनी या प्रश्नाकडे जातीने लक्ष देत पुन्हा एकदा कब्रस्तानात येऊन पाहणी करून कब्रस्तानच्या संरक्षक भिंतींची अवस्था बघावी असे आवाहन महेदवीया समाजाचे सदस्य तथा मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ यांनी केले आहे.

# आमदार संग्राम जगताप यांची पक्षातून हकालपट्टी करा : शेख युनूस

बीड । प्रतिनिधी



महाराष्ट्र हा छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज, मौलाना आझाद यांना मानणारा राज्य आहे. आणि या राज्यात जर आपल्याच पक्षातील अहमदनगर चे आमदार संग्राम जगताप जर मुसलमान विषयी अपशब्द वापरत असतील. तर मुस्लिम समाज कदापी खपवून घेणार नाही. राष्ट्रवादी पक्ष हा धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी विचारसरणी असणारा पक्ष आहे मग आपल्या पक्षात हा जातीवादी आणि सडक्या विचारांचा आमदार कसा? अशा आमदाराची आपल्या पक्षातून तत्काळ हकालपट्टी करावी आणि आमदारकीचा राजीनामा घ्यावा नाहीतर पुढील काळात मुस्लिम समाज तुमच्या पाठीशी राहणार नाही. आपल्या आमदाराने दोन समाजात तेढ निर्माण करण्याचे काम केलेले आहे. आपण त्याला पाठिशी घालू नये.

# ऐतिहासिक शहीद मोगलानी मस्जिदच्या मिळकतीत अवैध प्रकारे फेरफारला लावलेले नाव रद्द करा

## अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करु : सय्यद सलीम बापू

बीड । प्रतिनिधी

धारूर शहरातील ऐतिहासिक शहीद मोगलनी मस्जिदच्या मिळकतीतील शिवार धारूर येथे सर्वे नं ५५६ आणि ६१० मध्ये अवैध प्रकारे घेण्यात आलेले फेरफार मधील नाव रद्द करण्यात यावी अशी मागणी तहरीक–ए–इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सलीम बापू यांनी केली आहे.

असे की, धारूर शहर येथे महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ अंतर्गत येणारे देवस्थान शहीद मुघलानी मस्जिद असून येथील शिवार धारूर सर्वे नंबर ५५६ आणि ६१० मध्ये मस्जिदच्या नावाने देवस्थान इनाम मिळकत आहे. सदरील मिळकतीवर अवैध प्रकारे समस्त मस्जिद बीड च्या नावाची अदला – बदल करून अवैध व चुकीचे फेरफार करून काही खाजगी व्यक्तींची नावे लावण्यात आलेली आहे. मस्जिद इनाम मिळकतीचे अदला – बदल करता येत नाही तरी स्थानिक नेते, भू माफिया



आणि जिल्हा वक्फ अधिकारी व कर्मचारी यांच्या संगनमताने अदला – बदल करून फेरफारला नावे लावण्यात आली आहे. तरी वरील ऐतिहासिक देवस्थान मोगलानी मस्जिद मिळकतीच्या फेरफार मधील अवैध व चुकीचे नावे कमी करून वरील फेरफार मध्ये संबंधित देवस्थानच्या नावाची नोंद घेण्यात यावी अशी मागणी तहरीक–ए–इनाम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद सलीम बापू यांनी जिल्हाधिकारी बीड व जिल्हा वक्फ अधिकारी बीड यांना दिलेल्या एका निवेदनातून केली आहे.

वरील प्रकरणी आम्ही वेळोवेळी जिल्हा वक्फ अधिकारी यांच्याकडे तक्रारी केली असून वरील प्रकरणी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी कसलीही प्रतिक्रिया न देता उदासीनता दाखविली असून त्यांची ही उदासीनता संबंधित भू माफिया यांना खत पाणी घालणारी असून जिल्हा वक्फ अधिकारी हे सतत वक्फ कार्यालय येथे गैरहजर असतात. जिल्हा वक्फ अधिकारी हे त्यांचा पदाचा व कायद्याचा दुरुपयोग करत असून कार्यालयात पत्र देऊनही आम्हाला त्यांच्या प्रतिसाद भेटत नाही किंवा उत्तर भेटत नाही. तरी वरील प्रकरणी जिल्हा वक्फ अधिकारी यांनी चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर कार्यवाही करून अवैध प्रकारे घेण्यात आलेले फेरफार मधील नावे कमी करावे अन्यथा येत्या ०२ जुलै बुधवार रोजी सकाळी ११ वाजल्यापासून जिल्हा वक्फ कार्यालय बीड येथे तरीके इनाम संघटनेच्या वतीने लोकशाही मार्गाने तीव्र निदर्शने करण्यात येईल असे प्रसिद्धी माध्यमांना दिलेल्या पत्रकात नमूद केले आहे.

## महावितरण कार्यालयासमोर शेतकऱ्यांसमवेत विजय बडे यांचे अमरण उपोषण

# सिरसाळा फिटर व आचार्य टाकळी फिटर व सिरसाळा परिसरातील थ्री फेज ची बोंबाबोंब

सिरसाळा । प्रतिनिधी

२३ जुन २०२५ रेवली ग्रामपंचायत सदस्य तथा हिंदू राष्ट्र सेनेचे तालुका प्रमुख विजय बडे यांचे शेतकरी यांच्या मागण्यासाठी २७ तारखेपासून आमरण उपोषण विविध मागण्याचे निवेदन उपकार्यकारी अधिकारी परळी यांना दिले निवेदन पावसाने दांडी मारल्यामुळे शेतकरी हैराण असल्याचे चित्र सध्या शिरसाळा व परिसरात पाहायला मिळत आहे.



शेतकऱ्याकडे मुबलक पाणी असताना आचार्य टाकळी येथील सब स्टेशन येथील कर्मचारी दिगुल पावर हाऊस येथून थ्री फेज लाईटचा प्रॉब्लेम नसला तरी शेतकऱ्यांच्या मोबाईल नंबर वर मेसेज टाकून दिवसभर शांत बसतात अशा ह्या महावितरणच्या गलथान कारभारामुळे थ्री फेज लाईट सुद्धा शेतकरी यांना वेळेवर मिळत नाही डबल फेस लाईट तसेच खाजगी लोकांकडून होणारी शेतकरी आणि नागरिकाची लूट थांबवण्यात यावी थ्री फेज व डबल फेज फ्लाईट सुरळीत पुरवठा करण्यात यावा यासह इतर मागण्यांचे निवेदन आज तालुकाप्रमुख विजय बडे व शेतकरी यांच्या वतीने देण्यात आले.

# शहरातील रस्त्याचं काम अपूर्ण, पण नागरिकांचं आयुष्य धोक्यात?

## तेलगाव नाका चौकातील मृत्यूस जबाबदार कोण? : शेख इमरोज शरीफ

बीड । प्रतिनिधी



बीड शहरातील तेलगाव नाका चौक परिसरात सुरू असलेल्या सिमेंट रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असून, नागरिकांच्या जिवाशी खेळ केला जात आहे. या अपूर्ण कामामुळे दोन दिवसांपूर्वी एका तरुणाचा दुर्दैवी मृत्यू झाला. सतत होणाऱ्या किरकोळ अपघातांमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण आहे. या चौकात शाळा, दुकाने, रिक्षा, शालेय वाहने आणि नागरिकांची मोठ्या प्रमाणात ये–जा असते. रस्त्याचा काम अपूर्ण असून, कुठेही वाहतूक पोलीस नेमण्यात आलेले नाहीत. धूळ, खड्डे आणि वाहतूक कोंडी यामुळे वृद्ध, महिला आणि लहान मुलांसाठीही हा मार्ग धोकादायक ठरतो आहे.

या अपघातासाठी जबाबदार नेमकं कोण? गुत्तेदार? अभियंता? की प्रशासन? कोणीही जबाबदारी स्वीकारायला तयार नाही आणि नागरिकांच्या प्रश्नांची उत्तरं कुणाकडेही नाहीत. या प्रकरणी अपघातग्रस्त कुटुंबाला मदत होणार का? दोषींवर कारवाई केली जाणार का? आणि सर्वात महत्त्वाचं – हे काम पूर्ण होईपर्यंत अजून किती जीवांचा बळी जाईल? तेलगाव नाका परिसरातील हे काम लवकरात लवकर पूर्ण करावे अशी मागणी नागरिक आणि व्यापाऱ्यांसह जनते च्या वतीने आजाद पत्रकार शेख इमरोज शरीफ यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

# रुपामाताची जप्ती करुन लिलावातुन बिले द्या : नारायण गोले पाटील





माजलगाव । प्रतिनिधी

माजलगावं तालुक्यातील रोशन पुरी येथील गुराळाने शेतकऱ्याचा ऊसाचे गेल्या सहा महिन्यापासून बिले दिलेली नाहीत त्यामुळे शेतकरी प्रचंड संकटात सापडला असून त्यावर दुबार पेरणीचे दुसरे संकट समोर असतानाही रूपामाता गुऱ्हाळाने शेतकऱ्याच्या उसाचे पैसे देण्यास स्टार प्रवाह सुरू केले असून त्याबाबत अनेक निवेदने देऊनही बिले न दिल्याने शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने उपविभागीय अधिकारी कार्यालय माजलगाव येथे शेतकऱ्यांच्या उसाच्या थकीत रकमेसाठी सकाळी ठीक अकरा वाजल्यापासून तब्बल अडीच तास हलगी बजाव आंदोलन प्रचंड घोषणाबाजी सह करण्यात आले.

यावेळी बोलताना शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ड नारायण गोले पाटील यांनी बोलताना सांगितले की, उपविभागीय अधिकारी यांनी रूपामाता गुऱ्हाळाची जप्ती करून त्याचा लिलाव करावा व लिलावाच्या आलेल्या रकमेतून शेतकऱ्यांच्या उसाचे बिले द्यावीत अन्यथा आम्हाला कायदा हातात घेऊन गुराळासह जमिनीचा ताबा घेण्याचा इशारा दिला.

या आंदोलनात शेकडो नागरिक व कार्यकर्ते सहभागी झाले होते. या आंदोलनाला पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता तर आंदोलनानंतर उपविभागीय अधिकारी श्री गौरव इंगोले यांनी आंदोलकांच्या मागण्याचे निवेदन घेऊन संबंधितांनी आठ दिवसात उसाची बिले न दिल्यास कठोर कार्यवाही करण्याबाबत आंदोलकांस आश्वाशित केले. या आंदोलनासाठी शेतकरी कामगार पक्षाचे भावी मुंजा पांचाळ, भाई श्रीराम शेवाळे, भाई सलीम खान पठाण, भाई विष्णू शेळके, जयराम कोरडे, मुक्तीराम कापसे, भाई भास्कर कांबळे यांच्यासह अनेकांनी परिश्रम घेतले.



श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांचे आजोबा ब्र. गोविंदपंत श्रीथ समाधीक्षेत्र बीड येथून आज आषाढी वारीसाठी दिंडी मार्गस्त झाली. तत्पूर्वी संस्थान च्या वतीने निमंत्रित शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम, पोलीस निरीक्षक शितलकुमार बल्लाळ यांच्या हस्ते पालखीची पालखीचे पुजन करून आरती करण्यात आली. यावेळी जेष्ठ नागरिक भरत लोळगे, डॉ. शिवप्रसाद चरखा, संजय हरणे, नवनाथ प्रभाळे, गणेश लोणकर सह भक्तगण मोठया संख्येने उपस्थित होता.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड–४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१–७–३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड–४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक – दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT